महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे

# जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

शुक्रवार ■ २७ फेब्रुवारी २०२६ ■ वर्ष - सातवे ■ अंक : २४२ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये


## संपादकीय

### गौरव मराठी भाषेचा

आज जागतिक मराठी भाषा गौरव दिन. हा दिवस केवळ एका भाषेचा उत्सव नसून, आपल्या सांस्कृतिक मुळांचा, वैचारिक परंपरेचा आणि सामाजिक जाणीवेचा गौरव करणारा आहे. मराठी ही फक्त संवादाची भाषा नाही; ती इतिहास, साहित्य, लोकशाही मूल्ये आणि सामान्य माणसाच्या जगण्याचा आवाज आहे. संत ज्ञानेश्वर, तुकाराम, एकनाथ यांच्यापासून ते आधुनिक साहित्यिक, विचारवंत आणि पत्रकारांपर्यंत मराठी भाषेने समाजप्रबोधनाची भूमिका बजावली आहे. जनसामान्यांच्या भावना, प्रश्न आणि स्वप्नांना शब्द देण्याचे सामर्थ्य मराठीत आहे. म्हणूनच काळ बदलला तरी मराठीची ओळख टिकून आहे. आजच्या तंत्रज्ञानप्रधान आणि जागतिकीकरणाच्या युगात मराठीसमोर नवी आव्हाने उभी आहेत. शिक्षण, प्रशासन, न्यायव्यवस्था, उद्योग, माध्यमे आणि डिजिटल प्लॅटफॉर्मवर मराठीचा वापर वाढवणे ही केवळ अपेक्षा नाही, तर गरज आहे. भाषा वापरात राहिली, तरच ती जिवंत राहते

जागतिक मराठी भाषा गौरव दिन हा औपचारिक कार्यक्रमांपुरता मर्यादित न राहता आत्मपरीक्षणाचा दिवस ठरावा. आपण मराठीचा किती आणि कसा वापर करतो? हा प्रश्न प्रत्येक मराठी माणसाने स्वतःला विचारला पाहिजे. घरात, शाळेत, कार्यालयात आणि ऑनलाईन विश्वात मराठीचा अभिमानाने वापर झाला, तरच या दिवसाचा खरा अर्थ साकार होईल. मराठी भाषेचा गौरव करताना तिच्या भविष्यातील वाटचालीकडेही लक्ष देणे तितकेच महत्वाचे आहे. नव्या पिढीला मराठीकडे आकर्षित करण्यासाठी शिक्षणात, संशोधनात आणि तंत्रज्ञानात मराठीचा प्रभावी वापर वाढवावा लागेल. विज्ञान, नवोन्मेष, कृत्रिम बुद्धिमत्ता, स्टार्टअप्स आणि डिजिटल माध्यमांमध्ये मराठीची उपस्थिती वाढली, तरच भाषा काळाबरोबर पुढे जाईल. मराठीला केवळ भावनिक जिव्हाळ्यापुरती मर्यादित न ठेवता ज्ञानभाषा आणि रोजगारभाषा म्हणून सक्षम करणे, हाच आजच्या मराठी भाषा गौरव दिनाचा खरा संदेश आहे. मराठी भाषा ही आपली ओळख आहे, आपला वारसा आहे आणि आपली सामूहिक जबाबदारीही आहे. आजच्या या गौरवदिनी एकच संकल्प करूया — मराठी जगवूया, मराठी वाढवूया आणि मराठीचा सन्मान कृतीतून जपूया.

# बदलापूर स्त्रीबीज विक्री प्रकरणाची पाळेमुळे राज्यभर !

## - रूपाली चाकणकरांचा धक्कादायक खुलासा

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २६**

**बदलापूर : बदलापुरात उघडकीस आलेला स्त्रीबीज विक्रीचा अवैध प्रकार केवळ स्थानिक नसून त्याची पाळेमुळे संपूर्ण राज्यभर पसरलेली आहेत, असा धक्कादायक खुलासा राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी केला आहे. नाशिकमध्ये नोंदणीकृत असलेले, मात्र ठाण्यात सुरू असलेले एक आयव्हीएफ केंद्र या बेकायदेशीर विक्री प्रकरणात सक्रीय असल्याचे तपासात निष्पन्न झाले असून, त्यावर कारवाई करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली.**

या गंभीर प्रकरणाचा आढावा घेण्यासाठी गुरुवारी रूपाली चाकणकर बदलापुरात दाखल झाल्या होत्या. यावेळी त्यांनी पोलीस प्रशासन, जिल्हा शल्य चिकित्सक तसेच कुळगाव-बदलापूर नगर परिषदेच्या पदाधिकाऱ्यांची भेट घेऊन सविस्तर माहिती घेतली. बदलापूर व परिसरातील सर्व बेकायदेशीर आयव्हीएफ व सोनोग्राफी केंद्रांची तातडीने तपासणी करण्याचे आदेश त्यांनी संबंधित यंत्रणांना दिले.

**■ गरजू महिलांना आमिष; जीवाशी खेळ**

गरजू महिलांना हेरून पैशांचे आमिष दाखवत त्यांच्या शरीरात स्त्रीबीज विकसित करून ते काढून विक्री करण्याचा बेकायदेशीर प्रकार स्थानिक पोलीस व शासकीय आरोग्य यंत्रणेने उघडकीस आणला आहे. सुरुवातीला तीन महिलांना अटक करण्यात आली होती. तपास पुढे जाताच आणखी दोघांना अटक करण्यात आली असून, या प्रकरणामागे मोठी साखळी कार्यरत असल्याचे स्पष्ट होत आहे.




**■ रॅकेट मुळासकट उखडणार**

**स्त्रीबीज विक्रीचा विषय केवळ बदलापुरपुरता मर्यादित नसून संपूर्ण महाराष्ट्रात त्याचे जाळे पसरले आहे. हे रॅकेट मुळासकट उखडून काढण्याचा निर्धार राज्य महिला आयोगाने केला असून, बदलापूर व आसपासच्या सर्व बेकायदेशीर आयव्हीएफ व सोनोग्राफी केंद्रांवर आजपासून धाडसत्र सुरू करण्यात येणार असल्याचे चाकणकर यांनी ठामपणे सांगितले.**

कुळगाव-बदलापूर नगर परिषदेत झालेल्या बैठकीत परिमंडळ चारचे पोलीस उपायुक्त सचिन गोरे, जिल्हा शल्य चिकित्सक कैलास पवार, नगराध्यक्षा रुचिता घोरपडे तसेच उपनगराध्यक्षा प्रियांका दामले उपस्थित होत्या. यावेळी माध्यमांशी बोलताना चाकणकर यांनी सांगितले की, आरोपी काही दिवसांपूर्वी बदलापुरात आले होते. नाशिक येथील मालती आयव्हीएफ सेंटरला तिकडे परवानगी असताना ते ठाण्यात बेकायदेशीररीत्या सुरू करण्यात आले होते. एका महिलेनं आधार कार्ड बदलून ओळख बदलत प्रवास केल्याचेही तपासात समोर आले आहे. कोणतीही वैद्यकीय पार्श्वभूमी नसलेल्या महिलांकडून इंजेक्शन देणे, औषधे देणे अशी गंभीर कामे केली जात होती. दलाल महिलाच सर्व वैद्यकीय प्रक्रिया हाताळत होत्या, हा महिलांच्या जीवाशी उघडपणे खेळ होता, असेही त्यांनी स्पष्ट केले.

**मोठागाव रेतीबंदरात वाळू माफियांचे कंबरडे मोडले**

# डोंबिवलीत रेती तस्करांवर कारवाई

## ● 31 लाखांच्या क्रेन महसूल विभागाकडून उध्वस्त

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २६**

**डोंबिवली :** डोंबिवली पश्चिम माणकोली पुलाजवळील मोठागाव रेतीबंदर परिसरात महसूल विभागाच्या डोंबिवली विभागाने सलग दोन दिवस धडक कारवाई करत खाडीतून बेकायदा रेती उपसा करणाऱ्या वाळू तस्करांच्या सुमारे ३१ लाख रुपये किमतीच्या क्रेन तोडून टाकल्या. या क्रेनचा पुन्हा वापर होऊ नये, यासाठी त्यांचे सांगाडे जप्त करण्यात आले, तर काही भाग थेट खाडीत ढकलून देण्यात आले. या निर्णायक कारवाईमुळे वाळू माफियांमध्ये खळबळ उडाली असून त्यांचे कंबरडे मोडल्याचे चित्र आहे.

जिल्हाधिकाऱ्यांनी महसूल हद्दीतील बेकायदा रेती उपसा करणाऱ्या माफियांवर कठोर कारवाई करण्याचे स्पष्ट आदेश तहसीलदार व मंडळ अधिकाऱ्यांना दिले होते. त्या आदेशांनुसार कल्याणचे तहसीलदार विकास गारूडकर यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई राबवण्यात आली.

**■ अचानक धाड, पोलीस बंदोबस्त तैनात**

निवासी नायब तहसीलदार सत्यजित चव्हाण, नायब तहसीलदार पंजाबराव पवार, डोंबिवलीचे मंडळ अधिकारी रवींद्र जमदरे, ठाकुर्लीचे मंडळ अधिकारी खेडकर, प्रीती घुडे, पष्टे तसेच ग्राम महसूल अधिकारी यांच्या पथकाने पोलीस बंदोबस्तासह मोठागाव रेतीबंदर खाडी किनारी अचानक धाड टाकली. यावेळी खाडीत सुरू असलेला बेकायदा रेती उपसा उघडकीस आला. या प्रकरणी मंडळ अधिकारी रवींद्र जमदरे यांनी अज्ञात वाळू माफियांविरोधात विष्णुनगर पोलीस ठाणे येथे तक्रार दाखल केली आहे. पोलिसांनी जमीन महसूल अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

# मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींवर प्रशासक म्हणून माजी सरपंचांची नियुक्ती

## आ. किसन कथोरे यांच्या मागणीला यश

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २६**

**ठाणे :** राज्यातील मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींवर प्रशासक म्हणून कार्यकाळ पूर्ण केलेल्या माजी सरपंचांचीच नियुक्ती करण्यात यावी, या संदर्भात राज्य शासनाकडे सादर करण्यात आलेल्या निवेदनाला यश आले आहे. यासंबंधीचा शासन निर्णय जाहीर करण्यात आला असून, ही मागणी मान्य झाल्याची माहिती माजी आमदार किसन कथोरे यांनी दिली.

ग्रामीण भागातील प्रशासनिक सातत्य टिकून राहावे, स्थानिक विकासकामांची गती अबाधित राहावी तसेच ग्रामस्थांचा विश्वास कायम राहावा, या उद्देशाने ही मागणी करण्यात आली होती. शासनाच्या या निर्णयामुळे स्थानिक परिस्थितीची जाण आणि प्रशासनाचा अनुभव असलेल्या माजी सरपंचांच्या माध्यमातून ग्रामपंचायतींचे कामकाज अधिक परिणामकारकपणे पार पडेल, असा विश्वास किसन कथोरे यांनी व्यक्त केला आहे.

**■ सरपंच बांधवांना दिलासा**

या निर्णयामुळे अनेक ग्रामपंचायतींमध्ये प्रशासक नियुक्तीबाबत निर्माण होणारा संभ्रम दूर होणार असून, अनुभवी नेतृत्वामुळे विकासकामांमध्ये सातत्य राहण्यास मदत होणार आहे. ग्रामीण प्रशासन अधिक सक्षम होण्याच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वाचा ठरणार असल्याचे मतही व्यक्त केले जात आहे.

**■ मुख्यमंत्री व ग्रामविकास मंत्र्यांचे आभार**

या सकारात्मक निर्णयाबद्दल राज्याचे मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांचे सरपंच बांधवांच्या वतीने मनःपूर्वक आभार किसन कथोरे यांनी व्यक्त केले आहेत.


किसन शंकर कथोरे
आमदार, १३१ मुरबाड विधानसभा क्षेत्र
जि. ठाणे

प्रति,
मा.ना.श्री.देवेंद्रजी फडणवीस साहेब,
मुख्यमंत्री
महाराष्ट्र राज्य,मंत्रालय मुंबई.

विषय :- ग्रामपंचायतीवर प्रशासक म्हणून माजी सरपंच याना नियुक्त करणेबाबत...

महोदय,
उपरोक्त विषयान्वये महाराष्ट्र राज्यातील ज्या ग्रामपंचायतीच्या मुदती संपत आहेत अशा 14,237 ग्रामपंचायतीवर प्रशासकाची नियुक्त करण्याबाबतचे आदेश ग्रामविकास विभागाने दिलेले आहेत.

त्याकरिता महाराष्ट्र राज्यातील 14,237 ग्रामपंचायतींची मुदत संपत आहे अशा ग्रामपंचायतींवर प्रशासक म्हणुन माजी सरपंच यांना नियुक्त करण्यात यावे,ही विनंती.

आपला स्नेहांकित,
(आ.किसन कथोरे)

**ग्रामीण प्रशासनात सातत्य व विकासकामांना गती मिळणार, - असा विश्वास**

## थोडक्यात महत्वाचे

# वाशाळा परिसरात बिबट्याची निर्घृण हत्या

## ■ तस्करी रॅकेटचा संशय

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २६**

**शहापूर :** वाशाळा भागातील पिंगळवाडी व ढाकणे क्षेत्रातील एका नदीपात्रालगत नर जातीच्या बिबट्याचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. प्राथमिक तपासात या बिबट्याची निर्घृणपणे हत्या करण्यात आल्याचे स्पष्ट झाले असून, त्याचे दोन्ही पायांचे पंजे तोडण्यात आले होते. तसेच एका पायाची नखेही गायब असल्याचे आढळून आले आहे. मृत बिबट्या सुमारे दोन वर्षांचा असल्याची माहिती वनविभागाने दिली आहे. घनदाट वनसंपदेने नटलेल्या वाशाळा परिसरातील पिंगळवाडी व ढाकणे भागातील नदीपात्रात मंगळवारी बिबट्याचा मृतदेह असल्याची माहिती वनाधिकाऱ्यांना मिळताच वाशाळा वनपरिक्षेत्र अधिकारी एकनाथ रोंगटे यांनी पथकासह घटनास्थळी धाव घेतली. पाहणीदरम्यान बिबट्याचे पंजे तोडलेले असून नखे गायब असल्याचे निदर्शनास आले. संशयास्पद परिस्थितीत मृतदेह आढळल्याने वनविभागाने या घटनेची गंभीर दखल घेत तातडीने तपास सुरू केला.

**■ तस्करीच्या हेतूने शिकार झाल्याचा अंदाज**

स्थानिक माहिती व तांत्रिक तपासाच्या आधारे दोन संशयित आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांनी गुन्ह्याची कबुली दिल्याचे वनविभागाकडून सांगण्यात आले आहे. या प्रकरणामागे वन्यजीव अवयव तस्करीचे रॅकेट कार्यरत आहे का, याचा सखोल तपास सुरू असून अन्य फरार आरोपींचा शोधही वेगाने सुरू आहे. बिबट्याची शिकार ही वन्यजीव व त्याच्या अवयवांच्या तस्करीसाठीच करण्यात आल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

**■ शवविच्छेदन व नमुने प्रयोगशाळेत**

दरम्यान, खर्डी, अघईसह चार पशुसंवर्धन अधिकाऱ्यांनी बिबट्याचे शवविच्छेदन केले. अवयवांचे नमुने न्यायवैद्यक प्रयोगशाळेत तपासासाठी पाठवण्यात आले असून, त्यानंतर बिबट्याचे विधीपूर्वक दफन करण्यात आले आहे. या प्रकरणातील इतर आरोपींचा शोध वनविभाग व पोलिसांकडून संयुक्तपणे घेतला जात आहे.

# प्रादेशिक मनोरुग्णालयातील वृक्षतोडीविरोधात शरद पवार गट आक्रमक



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २६**

**ठाणे :** ठाणे शहरातील प्रादेशिक मनोरुग्णालय परिसरातील ४२४ वृक्षांची कत्तल सुरू करण्यात आल्याचा आरोप होत असून, या वृक्षतोडीविरोधात राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाने आक्रमक भूमिका घेतली आहे. या प्रकरणी कारवाई न झाल्यास उच्च न्यायालयात अवमानना याचिका दाखल करण्याचा इशारा शरद पवार गटाने दिला आहे. प्रादेशिक मनोरुग्णालय परिसरात प्रस्तावित असलेली ४२४ वृक्षांची तोड रोखण्यात यावी, अशी मागणी सातत्याने केली जात आहे. यापूर्वी डिसेंबर महिन्यात शरद पवार गटाने वृक्षतोडीविरोधात आंदोलनही केले होते. मात्र, आंदोलनानंतरही ठोस कारवाई न झाल्याने पक्षात तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. शरद पवार गटाचे जिल्हाध्यक्ष मनोज प्रधान यांच्या नेतृत्वाखाली पक्षाच्या शिष्टमंडळाने ठाणे महापालिकेचे उपायुक्त मधुकर बोडके यांची भेट घेतली. यावेळी वृक्षतोडीप्रकरणी कारवाई न झाल्यास महापालिकेविरोधात अवमानना याचिका दाखल करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा देण्यात आला. त्यानंतर मनोज प्रधान यांनी पत्रकार परिषद घेऊन महापालिकेवर जोरदार टीका केली. दरम्यान, वागळे इस्टेट पोलीस ठाण्याकडून याबाबत तक्रार दाखल करण्याची सूचना ठाणे महापालिकेला देण्यात आली होती. मात्र, अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नसल्याचा आरोप करण्यात येत आहे.









# अभिजात मराठी भाषेच्या गौरवासाठी...

**२७ फेब्रुवारी!**
**मराठी भाषा गौरव दिन!**

अर्थात, कवींचे कवी, थोर नाटककार विष्णू वामन शिरवाडकर म्हणजेच कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस!

मराठी भाषेतील अग्रेसर कवी, नाटककार व कादंबरीकार म्हणून सर्व महाराष्ट्राला सुपरिचित व्यक्तिमत्व असणारे आपल्या सर्वांचे तात्यासाहेब! इसवी सन १९८७ च्या तेविसाव्या ज्ञानपीठ पुरस्काराचे मानकरी, इसवी सन १९८९ मध्ये मुंबई येथे भरलेल्या पहिल्या जागतिक मराठी परिषदेचे अध्यक्ष आणि पुणे विद्यापीठाने डी.लिट. या सन्मानदर्शक पदवीने सन्मानित केलेले वि. वा. शिरवाडकर! शिरवाडकरांनी त्यांच्या साहित्य लेखनातून मराठी साहित्य क्षेत्रात मोलाचे योगदान दिले. मराठी सारस्वताची त्यांनी अखंडपणे सेवा केली. साहित्य क्षेत्राला नवा आयाम व नवे वैभव प्राप्त करून दिले. त्यामुळेच त्यांच्या साहित्य क्षेत्रातील देदिप्यमान कामगिरीचा गौरव म्हणून २७ फेब्रुवारी हा कुसुमाग्रजांचा जन्मदिवस 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून संपूर्ण महाराष्ट्रात आनंद व उत्साहाने साजरा केला जातो.

मराठी ही आपली मायबोली आहे, ही बाब आपल्यासाठी भाग्याची आहे.

**"लाभले आम्हांस भाग्य,**
**बोलतो मराठी।**
**जाहलो खरेच धन्य,**
**ऐकतो मराठी।**
**धर्म, पंथ, जात एक,**
**जाणतो मराठी।**
**एवढ्या जगात माय,**
**मानतो मराठी!"**

मराठी भाषेची परंपरा अत्यंत उज्ज्वल व समृद्ध आहे. मराठीचे साहित्य, इतिहास, संतपरंपरा, लोकसंस्कृती, आणि सामाजिक असे योगदान हे वैशिष्ट्यपूर्ण आहे. मराठी भाषा सुमारे १००० वर्षांहून अधिक काळापासून अस्तित्वात आहे. १२०व्या शतकातील यादवांच्या काळात तिचा वापर लिपीमध्ये झाला. अनेक शिलालेख, ताम्रपट व हस्तलिखिते यावरून तिचा इतिहास दिसून येतो. मराठी भाषेच्या समृद्धीला संतांच्या साहित्याने मोठे योगदान दिले. संत ज्ञानेश्वर (१२७५-१२९६) यांनी 'भावार्थदीपिका' म्हणजेच ज्ञानेश्वरी लिहिली, जी मराठीत पहिली महाकाव्यात्मक टीका होती. संत तुकाराम, संत नामदेव, संत एकनाथ यांच्या अभंगांनी आणि ओवी साहित्यातून समाजाला आत्मबळ दिले. संत, पंत व तंत या साहित्य प्रवृत्तींनी अनेक साहित्यिक व त्यांच्या साहित्यिक रचनांनी मराठी भाषेचे दालन समृद्ध केले.

मराठी भाषेने स्वराज्य स्थापनेच्या चळवळीत मोठी भूमिका बजावली. छत्रपती शिवाजी महाराजांनी मराठीतच प्रशासन चालवले. त्यांच्या काळात मराठीत राज्यव्यवहार कोष, राज्यकारभार पत्रव्यवहार, आणि हुकुमनामे प्रसिद्ध झाले. पुढे १८व्या आणि १९व्या शतकात मराठीत अनेक उत्तम लेखक आणि विचारवंत साहित्यिक उदयास आले. लोकहितवादी, महात्मा फुले, आगरकर, टिळक गोखले, रानडे आदी समाजसुधारकांनी मराठी भाषेत विपुल लेखन केले. वि.स.खांडेकर, पु.ल. देशपांडे, वि.वा. शिरवाडकर, प्र.के.अत्रे, विंदा करंदीकर शांता शेळके, शिवाजी सावंत आदींचे अमूल्य योगदान आहे.

मराठीत लोककलेला मोठा वारसा आहे. लावणी, भारूड, गोंधळ, तमाशा या कला मराठीतूनच विकसित झाल्या. पारंपरिक गीते, कोळीगीतं, गोंधळगीतं, पोवाडे हे लोकसाहित्याच्या समृद्ध परंपरेचे प्रतीक आहेत. मराठी भाषेतील वर्तमानपत्रांची भूमिकाही महत्वाची मानली जाते. १८४० मध्ये 'दर्पण' हे पहिले मराठी वृत्तपत्र बाळशास्त्री जांभेकर यांनी सुरू केले. लोकमान्य टिळकांचे 'केसरी' आणि 'मराठा' या पत्रांनी स्वातंत्र्यलढ्यात महत्वाची भूमिका बजावली. तसेच चित्रपट व नाटकांची भूमिकाही महत्वाची मानली जाते. दादासाहेब फाळकेंनी 'राजा हरिश्चंद्र' हा भारतातील पहिला चित्रपट तयार केला, जो मराठीत होता. मराठी नाट्यसृष्टीत केशवसुत, राम गणेश गडकरी, विजय तेंडुलकर, पु.ल.देशपांडे यांचा सिंहाचा वाटा आहे. भारताच्या विज्ञान, तंत्रज्ञान आणि प्रशासन क्षेत्रातही मराठी भाषिकांनी मोठे योगदान दिले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, जयंत नारळीकर, मोहन आगाशे, आनंद यादव अशा विचारवंतांनी ज्ञानाच्या विविध क्षेत्रांमध्ये कार्य केले आहे. थोडक्यात, मराठी भाषेची देदीप्यमान परंपरा आहे.

अशा या आपल्या दिव्य मराठी भाषेला ३ ऑक्टोबर २०२४ रोजी केंद्र सरकारकडून अधिकृतपणे 'अभिजात भाषेचा' दर्जा प्रदान करण्यात आला. याचा आपल्याला सार्थ अभिमान आहे. मराठी भाषा ही केवळ संवादाचे, भाषिक व्यवहाराचे साधन नसून संस्कृती, साहित्य, विचार, कला आणि समाजजागृतीचा आधारस्तंभ आहे. तिच्या या उज्ज्वल परंपरेचा आपण अभिमान बाळगायला हवा. आपण आपल्या मायबोलीच्या अभिजात दर्जाला साजेसा गौरव करण्यासाठी केवळ अभिमान बाळगून न थांबता कृतीशील प्रयत्न करायला हवेत.

कवी यशवंत म्हणतात, "हिचे पुत्र आम्ही हिचे पांग फेडू, हिला बैसवू वैभवाच्या शिखरी"

आपणही मायबोली मराठी भाषेचे सुपुत्र म्हणून मराठी भाषेला वैभव प्राप्त करून देण्यासाठी, मराठी भाषेला वैभवाच्या शिखरावर पोहोचविण्यासाठी मराठीत सदैव लेखन,वाचन व स्वरचित असे नवनवीन साहित्य निर्माण करणे, त्यात संशोधन करणे आदी प्रयत्न केले पाहिजेत. मराठी भाषेला वैभव प्राप्त करून देण्यासाठी संत ज्ञानेश्वर माउलींनी "माझा मराठाची बोलू कौतुके परी अमृतातेही पैजा जिंके;

**"ऐसी अक्षरे रसिके मेळविन"**

असा विडा उचलला तद्वतच आपणही मराठी भाषेची प्रगती व उन्नती साधण्यासाठी तिचे संवर्धन करण्यासाठी प्रत्यक्ष कृतीयुक्त यत्न करणे, ही आजच्या काळाची गरज आहे.

अनेक स्तरांवर भाषेच्या संवर्धन आणि विकासासाठी वेळोवेळी विविध स्पर्धा, उपक्रम, कार्यक्रम, चर्चासत्र, परिसंवाद, मुलाखतीचे कार्यक्रम आखले पाहिजेत. ठिकठिकाणी वाचनालये व ग्रंथालये निर्माण केली पाहिजेत. मराठी भाषक व्यक्तींनी वाचन चळवळ व ग्रंथालय चळवळीला प्रोत्साहन देऊन आर्थिक मदत व सहकार्य केले पाहिजे. मराठी वाचन संस्कृती विकास करून ती अधिक बळकट करण्यासाठी कादंबरी, नाटक, कथा, कविता यांच्या वाचन उपक्रमांचे आयोजन करून अभिजात ग्रंथ वाड्मयावर चर्चा, परिसंवाद, लेखन स्पर्धा आयोजित केल्या पाहिजेत. जास्तीत जास्त शाळा–महाविद्यालयांत मराठी वाड्मय मंडळे सुरू करून त्याद्वारे भाषाविकास करणाऱ्या उपक्रमांचे आयोजन केले पाहिजे. विविध विद्यापीठांत मराठी भाषा अभ्यासकेंद्र सुरू करून त्याद्वारे प्राचीन साहित्य, हस्तलिखिते, शिलालेख, बखरी यांचा अभ्यास करून त्यांचे संवर्धन केले पाहिजे. एकमेकांशी संवाद साधताना मराठीचाच आग्रह धरावा. अन्य भाषिकांशी बोलतानाही शक्यतो मराठीतूनच बोलावे. आपले घर, इमारती,कार्यालय, दुकाने यांच्या नावांच्या पाट्या शक्यतो मराठीतूनच टाकाव्यात. सार्वजनिक ठिकाणांची नावेही मराठीतूनच टाकण्याचा आग्रह धरावा.

अभिजात मराठीच्या गौरवासाठी डिजिटल माध्यमांचा काळजीपूर्वक वापर करून त्याद्वारे ई-ग्रंथ, ई-शब्दकोश, ई-पुस्तके, ऑडिओ-व्हिडीओ साहित्य, पॉडकास्ट इत्यादी मधून अभिजात मराठी साहित्य शुद्ध स्वरूपात उपलब्ध करून दिले पाहिजे. सोशल मीडियावर विशेष करून मराठी भाषेच्या विकासासाठी मराठी संकेतस्थळे, ब्लॉग, यूट्यूब चॅनेल तयार करण्यास प्रोत्साहन दिले पाहिजे. व्हाट्सॲप, फेसबूक, इंस्टाग्राम यासारख्या सोशल मीडियावर संवाद साधताना इंग्रजी भाषेऐवजी मराठी भाषेचा वापर करून संवाद साधणे, ही काळाची गरज आहे. नाहीतर आपली मायबोली मराठी नामशेष झाल्याशिवाय राहणार नाही! जगातील विविध देशांमध्ये आपले आयटी क्षेत्रात जे कार्य करतात किंवा जे सॉफ्टवेअर इंजिनिअर आहेत त्यांनी आणि इतर जाणकार व्यक्तींनी एक नैतिक जबाबदारी म्हणून आपल्या मायबोली मराठीतील अनमोल व दुर्मिळ अशा साहित्याची डिजिटल स्वरूपातील उपलब्धता अधिक वाढविण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. त्यासाठी शासनाने व सेवाभावी संस्थांनी तसेच उद्योजक व मराठी प्रेमी दानशूर व्यक्तींनी आर्थिक पाठबळ दिले पाहिजे. कदाचित, या गोष्टी आपण जाणतेपणाने केल्यास मराठीला नवे वैभव प्राप्त होऊ शकेल. आपल्या अभिजात भाषेचा दर्जा टिकवून ठेवण्यासाठी आपण सर्वांनी एकत्र येऊन मराठी भाषिक कार्यक्रम व उपक्रम यांचे उत्तम नियोजन करून त्याद्वारे मायबोली मराठीचे संवर्धन आणि संरक्षण केले पाहिजे. मराठी भाषकांनी एक होऊन मनात कोणताही वाद व भेद न बाळगता उत्तम प्रकारे राष्ट्रीय व राज्य अशा अनेक पातळीवर विविध साहित्य संमेलनांचे यशस्वीपणे आयोजन केले पाहिजे. आपण सर्वांनी व शासनाने तसेच अनेक संस्थांनी समर्पण भावनेने व सचोटीने निरंतर प्रामाणिक प्रयत्न करणे काळाची गरज आहे. आपण प्रत्येकाने आपला 'मराठी बाणा' मनात जपला पाहिजे. त्यामुळेच आपली मायबोली आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात अधिक व्यापक स्वरूप धारण करून विकसित होऊ शकेल. तेव्हाच माऊलींचे "इये मराठीचिये नगरी ब्रह्मविद्येचा सुकाळू करी" हे बोल आपण वास्तवात आणू शकू! आणि "माझ्या मराठी मातीचा लावा ललाटास टिळा, हिच्या संगे जागतील मायदेशातील शिळा!" ही कुसुमाग्रज यांनी दिलेली शिकवणही आपण मनात कोरली पाहिजे. मायबोली मराठी भाषा समृद्ध व विकसित करण्यासाठी तिच्या गौरवशाली व समृद्ध परंपरेची जाण आपल्या मनामनांत सदैव राहिली पाहिजे. मराठी साहित्याचा वारसा जपणे व साहित्याची उज्ज्वल परंपरा जपणे हे आपले आद्य कर्तव्य आहे. मराठी भाषेचा एक निष्ठावंत पाईक म्हणून आपल्या अभिजात मराठीच्या गौरवासासाठी आपण हे प्रयत्न जाणीवपूर्वक कराल, हा आशावाद व्यक्त करतो. मराठी भाषा गौरव दिनाच्या आपणा सर्वांस मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा!



शारदासुत
सुनील म्हसकर, शहापूर

# मराठी भाषा गौरव दिन

हे राष्ट्र मराठी माणसांचे
हे सूर्य चंद्र तारे मायबोलीने जाणवायचे
अस्मिता राहू दे मराठी भाषेची
गोडवे गाऊ आम्ही या अविट भाषेची
दरबारी दिल्लीच्या मिळाला बहुमान
वाटे त्याचाच मोठा अभिमान
सारे मिळून करूया जय जयकार
ज्ञानेश्वरांनी रुजवली लिहून ज्ञानेश्वरी
तुकोबांनी चढविला कळस रचून गाथा
कुसुमग्रजानी वर्णिली अलंकरीत कथा
शिवरायांनी दूर केली मराठीची व्यथा
आपली शान मराठी मान मराठी
महाराष्ट्राचा श्वास मराठी
जगण्याचा ध्यास मराठी
आस अमुची महाराष्ट्राचा परिचय
मराठी संस्कृतीने घडावा
सर्वत्र मराठीचा जागर व्हावा
मराठी भाषेचा आदर वाढावा
सुवासिक पुलाप्रमाणे गंध दरवळावा
जगभर मराठी भाषेचा झेंडा फडकत राहावा



लीना बल्लाळ, ठाणे
भ्रमणध्वनी
9920524424

# डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानतर्फे रविवारी स्वच्छता अभियान

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान, रेवदंडा यांच्या सौजन्याने डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या वाढदिवसाच्या स्मृती दिना निमित्त रविवार, दि. १ मार्च रोजी सकाळी ८ वा. कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील रस्ते, गावे व सार्वजनिक ठिकाणी "स्वच्छता अभियान" नियोजित केले आहे. हि स्वच्छता मोहिम स्वच्छ भारत अभियानाचे महाराष्ट्र राज्याचे महामहिम राज्यपालांनी नियुक्त केलेले "स्वच्छतादूत" डॉ.श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान, रेवदंडा चे अध्यक्ष, " पद्मश्री पुरस्कार" सन्मानित डॉ. अप्पासाहेब धर्माधिकारी व डॉ. सचिन धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली नियोजित करण्यात आली आहे.या अभियानात कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील शासकिय अधिकारी, लोकप्रतिनिधी, समाजसेवक व नागरिक सहभागी होतील.

# कल्याणमध्ये रविवारी मोफत नेत्र तपासणी शिबीर

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : सोशल सर्व्हिस लीग, कल्याण धर्मादाय डोळ्यांचे व जनरल हॉस्पिटलच्या वतीने हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम निमित्त रविवार दिनांक १ मार्च रोजी सकाळी १० ते दुपारी १ पर्यंत मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन गुरु सिंग सभा गुरुद्वारा, रामबाग लेन नंबर ४, कल्याण पश्चिम याठिकाणी करण्यात आले आहे. नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# सावरकर व आनंदीबाई जोशी यांच्या स्मृतिदिनी मनपातर्फे आदरांजली



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : "स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर" व "डॉ. आनंदीबाई जोशी" यांच्या स्मृती दिनी महापालिका मुख्यालयात स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर यांच्या प्रतिमेस व डॉ. आनंदीबाई जोशी यांच्या प्रतिमेस महापौर हर्षाली विजय चौधरी यांनी पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली.

महापालिका भवनातील स्वातंत्र्यवीर वि.दा. सावरकर सभागृहातील ,स्वातंत्र्यवीर वि.दा. सावरकर यांच्या प्रतिमेसही महापौर हर्षाली चौधरी पुष्पहार अर्पण करुन आदरांजली वाहिली. या समयी शहर अभियंता अनिता परदेशी, महापालिका सचिव किशोर शेळके, उपायुक्त समीर भुमकर, माहिती व जनसंपर्क अधिकारी माधवी पोफळे , सुरक्षा अधिकारी भारत बुळे आणि सचिव विभागातील अधीक्षक मधुकर भोये तसेच इतर कर्मचारी वर्ग यांनी देखील स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर आणि डॉ. आनंदीबाई जोशी यांच्या प्रतिमेस प्रतिमेस पुष्पसुमने अर्पण करुन आदरांजली वाहिली.

# थकबाकीपोटी ए ॲण्ड जी हॉस्पिटलची ॲडमिन रूम सील

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : "महापालिकेच्या 4/जे प्रभागात रक्कम रुपये 75,47,025/- एवढया थकबाकीपोटी मुरबाड रोड कल्याण (प.) येथील ए ॲण्ड जी हॉस्पिटलची ॲडमीन रुम सिल करण्याची धडक कारवाई!

महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांच्या निर्देशानुसार महापालिकेच्या प्रभागात कर वसुलीची मोहिम अधिकाधीक तीव्र करण्यात येत आहे. काल कल्याण (प). मुरबाड रोड येथील 4/जे प्रभागातील भारत एम सूचक संचलित ए ॲण्ड जी हॉस्पिटल मिळकत क्र. B02012338601, रक्कम रुपये 75,47,025/- एवढया थकबाकीपोटी सदर रुग्णालयाची ॲडमीन रुम सिल करण्याची कारवाई महापालिकेच्या 4/जे प्रभागाच्या सहाय्यक आयुक्त सविता हिले व त्यांच्या पथकाने केले.




कर चुकवेगिरी करणाऱ्यांवर या पुढेही अशी कारवाई केली जाईल, तरी महापालिका क्षेत्रातील नागरिकांनी आपला कराचा भरणा विहित मुदतीत करावा असे आवाहन महापालिकेच्या कर निर्धारण व संकलन विभागामार्फत करण्यात येत आहे .

# महिला दिनी केडीएमसीतर्फे 'अहिल्या - जागर- स्त्री शक्तीचा'

## महिलांसाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : 8 मार्च रोजी जागतिक महिला दिनी करायच्याचा कार्यक्रमांची रुपरेषा ठरविण्यासाठी बुधवारी कल्याण डोंबिवली महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांच्या दालनात बैठक संपन्न झाली. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या 300 व्या जयंतीचे औचित्य साधून "अहिल्या - जागर-स्त्री शक्तीचा" या मथळ्याखाली विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्याबाबतच्या सूचना या बैठकीत महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना दिल्या.यावेळी अतिरिक्त शहर अभियंता (यांत्रिकी, विद्युत) प्रशांत भागवत, महापालिका सचिव किशोर शेळके, उप आयुक्त वंदना गुळवे, प्रसाद बोरकर, रामदास कोकरे, कांचन गायकवाड, मुख्य उद्यान अधिक्षक संजय जाधव, वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ. दिपा शुक्ला, डॉ. पुर्णिमा ढाके, सहा. आयुक्त सुषमा मांडगे, माहिती व जनसंपर्क अधिकारी माधवी पोफळे, समाज विकास अधिकारी प्रशांत गवाणकर, मुख्य स्वच्छता अधिकारी अगस्तिन घुटे उपस्थित होते.

या वर्षी महिला दिनाचे औचित्य साधून 6 ते 8मार्च रोजी कल्याण (प.) येथील सिटी पार्क येथे महिला बचत गटामार्फत खाद्य पदार्थ विक्री व इतर स्टॉल्सचे आयोजन करण्यात आले आहे. 7 मार्च रोजी इयत्ता 8 वी, 9 वी व 11 वी तील किशोरवयीन विद्यार्थीनींकरिता समुपदेशन व्याख्यानाचे आयोजन. सर्व मनपा शाळांमध्ये हिपॅटायटीस-A लसीकरणाची मोहिमेचे आयोजन. 8 मार्च रोजी सकाळच्या प्रहरात आयएमए व महापालिका यांच्या संयुक्त विद्यमाने रणरागिणी मॅराथॉन स्पर्धेचे आयोजन, लाईट हाउस कम्युनिटीज व महापालिकेमार्फत आंबिवली येथील कौशल्य विकास केंद्र येथे रोजगारप्राप्त महिलांचा महापौरांच्या हस्ते सन्मान करण्यात येणार आहे.

टाटा मेमोरियल हॉस्पिटल व महापालिका यांच्या संयुक्त विद्यमाने मिशन शक्ती मोहिमे अंतर्गत संशयित कॅन्सर ग्रस्त महिला रुग्णांकरीता विशेष कॅन्सर तपासणी शिबिराचे आयोजन, सायंकाळी 4 वाजल्यापासून सिटी पार्कमध्ये, महापालिका व सिटी पार्क मॅनेजमेंट यांच्या संयुक्त विद्यमाने मध्ये सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन, कर्तुत्ववान महिलांचा सन्मान सोहळा, महिला व बाल कल्याण विभागामार्फत खुल्या महिला बचत गटांना प्रातिनिधीक स्वरुपात अनुदान, तसेच निराधार विधवा परितक्त्या घटस्फोटीत महिलांच्या कुटुंबातील विवाहयोग्य मुलींना विवाहाकरीता प्रातिनिधीक स्वरुपात अर्थसहाय्य अनुदान वितरण अशाप्रकारे अनेकविध कार्यक्रमाचा लाभ, महिला दिनानिमित्त महिलांना घेता येणार आहे.

# बी.जी.पी दवाखान्यात गर्भाशय व स्तन कर्करोग तपासणी मोफत सुरू

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** : भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका अंतर्गत बी.जी.पी दवाखाना, मंडई येथे गर्भाशयाच्या ग्रीवेचा आणि स्तनाचा कर्करोग तपासणी फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया भिवंडी यांच्या मार्फत करण्यात येत आहे. त्याअनुषंगाने बी.जी. पी. दवाखान्यात गर्भाशयाच्या ग्रीवेचा आणि स्तनाचा कर्करोग तपासणी करण्यात येत आहे. तरी दर गुरूवारी सकाळी ११.०० ते दुपारी १.०० वाजेपर्यंत सुरू असणार असल्याने बी.जी. पी. दवाखान्यात रूग्णांनी / नागरीकांनी लाभ घ्यावा व सदरचा संदेश आपल्या आसपासच्या नागरीकांना व मित्र मंडळी यांना देण्यात यावे असे आवाहन महानगरपालिका प्रशासनामार्फत करण्यात येत आहे.

# सावरकर पुण्यतिथीनिमित्त ठाणे महापालिकेत अभिवादन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : ठाणे महानगरपालिकेच्या विद्यमाने महापालिकेच्या कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांचे प्रतिमेस महापौर शर्मिला पिंपळोलकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी अतिरिक्त आयुक्त 2 प्रशांत रोडे, उपायुक्त उमेश बिरारी, सुरक्षा



अधिकारी घनश्याम फर्डे, प्र. उपमाहिती जनसंपर्क अधिकारी प्राची डिंगणकर यांच्यासह महापालिकेच्या विविध विभागांचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

# भविष्यवेध



शुक्रवार
२७ फेब्रुवारी २०२६

**मेष**
कुटुंबासोबत निवांत वेळ घालवण्याचा प्रयत्न कराल. घरातील वातावरण आनंददायी राहील. लहान मुलांना मोठे आश्चर्य मिळू शकते.

**वृषभ**
ऑफीसच्या कामात काही लोकं मदत करू शकतात. तुमच्या आर्थिक समस्या सुटतील. आज तुम्ही नवीन प्रकल्प सुरू करण्याचा विचार कराल.

**मिथुन**
तुम्हाला तुमच्या आरोग्याबद्दल थोडे काळजी घेणे आवश्यक आहे. थोड्या मौजमजेच्या मूडमध्ये असाल आणि तुमचे मन आनंदी असेल.

**कर्क**
एखाद्या पारंपारिक गोष्टीकडे आकर्षित होऊ शकता. आज तुम्ही तुमच्या बालपणीच्या मित्राला भेटाल आणि काही जुन्या आठवणींना उजाळा द्याल.

**सिंह**
तुमच्या दैनंदिन जीवनात नवचैतन्य येईल. विद्यार्थ्यांचा आजचा दिवस चांगला जाईल, कारण ते त्यांचे कॉलेज प्रकल्प पूर्ण करण्यात यशस्वी होतील.

**कन्या**
एखाद्या धार्मिक कार्यक्रमाचे नियोजन करू शकता. काम पूर्णपणे आवडेल. पण कामात काही बदल करू शकता, ज्यामुळे बरे वाटेल. कुटुंबात सर्व ठीक असेल.

**तुळ**
जवळचा नातेवाईक आनंदाची बातमी घेऊन येईल. दिवस प्रेमींसाठी चांगला असेल. नवविवाहित जोडप्यांमध्ये गोड बोलणे होईल, दिवस छान जाईल. एखाद्या

**वृश्चिक**
गरजेच्या गोष्टीच्या खरेदीवर पैसे खर्च करू शकता. कवितेसाठी प्रशंसा मिळू शकते. तुम्हाला एखाद्या संस्थेकडून सन्मानित देखील केले जाऊ शकते.

**धनु**
तुमच्या पालकांचे आशीर्वाद तुम्हाला तुमचे ध्येय साध्य करण्यास मदत करतील. तुम्हाला तुमच्या शेजाऱ्यांकडून काही प्रयत्नांमध्ये सहकार्य मिळेल.

**मकर**
तुम्ही त्यांचे म्हणणे काळजीपूर्वक ऐकले पाहिजे. आज तुमचा सामाजिक दर्जा वाढेल. कामाच्या ठिकाणी आज आवडतं काम मिळू शकतं.

**कुंभ**
काही विषयांमध्ये तज्ञ म्हणून तुमची निवड होऊ शकते. कामाच्या ठिकाणी बढती मिळण्याची आणि उत्पन्नात वाढ होण्याची शक्यता आहे.

**मीन**
विद्यार्थ्यांना काही विषयांमध्ये रस वाढेल. तुम्ही तुमच्या प्रियजनांना मदत करण्यास नेहमीच तयार असाल. कामाच्या ठिकाणी नवीन अनुभव मिळतील.

# आता गंभीर आजारांवर घरपोच 'उपशामक काळजी'

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे : राज्यात वाढते कर्करोग, हृदयरोग आणि वृद्धापकाळाशी संबंधित आजार लक्षात घेऊन, महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने 'राज्य पॅलिएटिव्ह केअर कार्यक्रमा'ची (State Palliative Care Programme) व्याप्ती वाढविण्याचा आणि तो अधिक सक्षम करण्याचा महत्त्वाकांक्षी निर्णय घेतला आहे. या निर्णयानुसार आता केवळ रुग्णालयातच नव्हे, तर 'आरोग्यवर्धिनी केंद्रां'च्या माध्यमातून गावागावात आणि रुग्णांच्या घरी जाऊन उपशामक सेवा पुरविली जाणार आहे.**

**'पॅलिएटिव्ह केअर' म्हणजे काय?**

अनेकदा 'पॅलिएटिव्ह केअर' म्हणजे केवळ आयुष्याच्या शेवटच्या टप्प्यातील सेवा असा समज असतो. मात्र, शासनाच्या नवीन निर्णयानुसार, आता आजाराचे निदान झाल्यापासून उपचारांच्या संपूर्ण कालावधीत रुग्णाला आणि त्याच्या नातेवाईकांना शारीरिक, मानसिक, सामाजिक व आध्यात्मिक आधार दिला जाईल. याचा उद्देश रुग्णाचे जीवन सुसह्य करणे आणि वेदना कमी करणे हा आहे.

**कार्यक्रमाची ठळक वैशिष्ट्ये:**

**1. घरोघरी आरोग्य सेवा (Home-based Care) :** समुदाय आरोग्य अधिकारी (CHO), ए.एन.एम. (ANM) आणि आशा सेविका (ASHA) यांच्या माध्यमातून रुग्णांचे सर्वेक्षण करून त्यांना घरीच सेवा दिली जाईल. रुग्णांच्या गरजेनुसार (जास्त, मध्यम किंवा कमी) आठवड्यातून किंवा महिन्यातून एकदा गृहभेट देऊन त्यांची तपासणी केली जाईल.

**2. मोफत औषधे आणि 'होम केअर किट':** तीव्र वेदना कमी करण्यासाठी 'मॉर्फिन' (Morphine) सारखी औषधे आता प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर उपलब्ध करून दिली जातील. तसेच, घरी उपचार घेणाऱ्या रुग्णांसाठी विशेष 'होम केअर किट' (Home Care Kit) पुरविले जाईल, ज्यामध्ये ड्रेसिंग साहित्य, आवश्यक औषधे आणि उपकरणांचा समावेश असेल.

**3. रुग्णालयांमध्ये राखीव खाटा:** जिल्हा रुग्णालयात 4 ते 6 खाटा, तर ग्रामीण व उपजिल्हा रुग्णालयात किमान 2 खाटा 'पॅलिएटिव्ह केअर' रुग्णांसाठी राखीव असतील. तसेच आठवड्यातून एकदा स्वतंत्र बाह्यरुग्ण विभाग (OPD) चालवला जाईल.

**4. कोणत्या आजारांचा समावेश?**
कर्करोग, अर्धांगवायू (Stroke), पार्किन्सन, किडनी किंवा यकृत निकामी होणे, दीर्घकालीन श्वसन विकार, वृद्धापकाळातील अशक्तपणा आणि इतर दुर्धर आजार.

**5. समुपदेशन आणि प्रशिक्षण:**
केवळ रुग्णच नाही, तर त्यांच्या कुटुंबियांना आणि काळजीवाहूंना (Caregivers) रुग्णाची काळजी कशी घ्यावी, याचे प्रशिक्षण आणि मानसिक आधार दिला जाईल.

**6. 24 तास मदतवाहिनी (Helpline) :** रुग्णांच्या मदतीसाठी '108/102' रुग्णवाहिका सेवेसोबतच, 'साथ-साथ' (1800-202-7777) आणि मानसिक आरोग्यासाठी 'टेलीमानस' (1800-89-14416) या टोल-फ्री क्रमांकांची सुविधा उपलब्ध असेल.

**लोकसहभाग आणि पुरस्कार:**

या कार्यक्रमात उत्कृष्ट काम करणाऱ्या ग्रामपंचायती आणि स्वयंसेवी संस्थांचा शासनातर्फे दरवर्षी पुरस्कार देऊन गौरव करण्यात येणार आहे.

ठाणे ग्रामीण भागामध्ये एकूण 844 रुग्णांना या palliative care कार्यक्रमाअंतर्गत घरी जाऊन आवश्यक त्या आरोग्य उपचार सेवा व समुपदेशन करण्यात येणार आहे.

या निर्णयामुळे राज्यातील सामान्य नागरिकांना, विशेषतः ग्रामीण भागातील रुग्णांना, त्यांच्या राहत्या घरीच सन्मानाने जगण्यासाठी आणि वेदनामुक्त उपचारांसाठी मोठा दिलासा मिळणार आहे.

ठाणे जिल्ह्यामध्ये हा कार्यक्रम ठाणे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ व मुख्य कार्यकारी अधिकारी ठाणे रणजीत यादव यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत असून या कार्यक्रमाची तांत्रिक अंमलबजावणी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. कैलास पवार व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे यांच्या अधिपत्याखाली केली जात आहे, असे जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद ठाणे डॉ. गंगाधर परगे यांनी कळविले आहे.


## उल्हासनगर महानगरपालिका

### महिला व बालकल्याण विभाग

दिनांक ०८ मार्च, २०२६ रोजी जागतिक महिला दिना निमित्त महिला व बालकल्याण विभागामार्फत कार्यक्रम आयोजित करण्यात येणार असून, सदर कार्यक्रमासाठी येणारा खर्चाचे दरपत्रके दिनांक २६/०२/२०२६ ते २७/०२/२०२६ पर्यंत सकाळी १०.०० ते ०५.०० वाजे पर्यंत स्विकारले जातील.

१) ८ मार्च जागतिक महिला दिना निमित्ताने उल्हासनगर शहरातील महिलांकरीता खेळ स्पर्धा व विविध सांस्कृतिक कार्यक्रमानिमित्त जेवण व नाश्ताची व्यवस्था करणे बाबत.
२) ८ मार्च जागतिक महिला दिना निमित्ताने उल्हासनगर शहरातील महिलांकरीता आरोग्य शिबीर ठिकाणी आवश्यक साहित्य पुरवठा करणेबाबत.
३) ८ मार्च जागतिक महिला दिना निमित्ताने उल्हासनगर शहरातील महिलांकरीता आयोजित करण्यात येणाऱ्या कार्यक्रमाच्या ठिकाणी (भगवंती नावानी स्टेज, गोलमैदान) मंडप, खुर्चा, कारपेट इतर आवश्यक साहित्य पुरवठा करणे.
४) अधिक माहिती महापालिकेच्या संकेत स्थळ www.umc.gov.in वर उपलब्ध आहे.

सही /-
उप आयुक्त
महिला व बालकल्याण विभाग
उल्हासनगर महानगरपालिका

जा.क्र. उमपा/ पीआरओ/५६४/२०२६
दि. २६/०२/२०२४


# कल्याण डोंबिवलीत नोटरी करारावरील घरांचा कर नवीन मालकाच्या नावे करा

## भाजप नगरसेवक दिपेश म्हात्रे यांची आयुक्तांकडे मागणी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण डोंबिवली नोटरी करारावर विक्री झालेल्या घरांचा मालमत्ता कर नवीन मालकाच्या नावे हस्तांतरित होत नसल्यामुळे मोठ्या प्रमाणात थकबाकी वाढत असल्याचा मुद्दा पुढे करत भाजप नगरसेवक दिपेश म्हात्रे यांनी केडीएमसी प्रशासनाकडे ठोस भूमिका घेण्याची मागणी केली आहे.




नोटरी करारावर अनेक घरे विकली गेल्यानंतरही त्या मालमत्तांचा कर जुन्या मालकाच्या नावावरच राहतो. परिणामी कर वसुलीत अडथळे निर्माण होत असून कोट्यवधी रुपयांची थकबाकी प्रलंबित आहे. यामुळे महापालिकेच्या उत्पन्नावरही परिणाम होत असल्याचे म्हात्रे यांनी नमूद केले. यासंदर्भात त्यांनी कल्याण डोंबिवली महानगरपालिका आयुक्तांची भेट घेऊन निवेदन दिले. नोटरी कराराच्या आधारे मालमत्ता विक्री झालेल्या प्रकरणांमध्ये आवश्यक कागदपत्रांच्या पडताळणीनंतर नवीन मालकाच्या नावे कर हस्तांतरण करण्यास परवानगी द्यावी, अशी मागणी त्यांनी केली.

# नोवेल साळवे यांच्या उपोषणाला कल्याण न्यायालय वकील संघटनेचा पाठींबा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण डोंबिवली महानगरपालिका हद्दीतील जनतेच्या प्रश्नांसाठी आझाद मैदान मुंबई येथे बेमुदत उपोषण करणारे नोवेल साळवे यांना कल्याण न्यायालय वकील संघटनेने जाहीर पाठिंबा दिला आहे. आझाद मैदान मुंबई येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे माजी प्रदेश सचिव नोवेल साळवे यांच्या वतीने कल्याण डोंबिवली महानगरपालिका हद्दीतील नागरिकांच्या ज्वलंत प्रश्नांवर सुरू केलेल्या बेमुदत उपोषणाचा आज आठवा दिवस असुन या आंदोलनाला कल्याण न्यायालय वकील संघटनेचे अध्यक्ष एडवोकेट प्रकाश जगताप यांनी त्यांच्या सहकारी वकिलांसोबत आझाद मैदान मुंबई येथे येऊन वकील संघटनेच्या वतीने नोवेल साळवे यांना जाहीर पाठिंबा दिले आहे.

# २६ व्या निरंकारी क्रिकेट स्पर्धेचे क्रीडा आणि शिस्तीचे प्रेरणादायी आयोजन

## महाराष्ट्रासह देशभरातील निवडक 24 संघांचा समावेश

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज आणि निरंकारी राजपिता रमितजी यांच्या मार्गदर्शनाखाली आध्यात्मिक जागृती, मानवी मूल्ये आणि क्रीडाभावनेचा सुंदर संगम साकारत २६व्या बाबा गुरबचन सिंह मेमोरियल क्रिकेट स्पर्धेचा भव्य शुभारंभ आज संत निरंकारी आध्यात्मिक स्थळ, समालखा येथे अत्यंत श्रद्धामय व अनुशासित वातावरणात संपन्न झाला. ही स्पर्धा केवळ क्रीडास्पर्धा नसून मानवता, एकता आणि सामूहिक प्रगतीचा सशक्त संदेश देणारा प्रेरणादायी उपक्रम आहे.

दिनांक २६ फेब्रुवारी ते १० मार्च या कालावधीत आयोजित या प्रतिष्ठित स्पर्धेत देशभरातील २४ अव्वल संघ सहभागी झाले आहेत. महाराष्ट्र, पंजाब, उत्तर प्रदेश, बिहार, राजस्थान, जम्मू, हिमाचल प्रदेश, मध्य प्रदेश, हरियाणा, ओरिसा, कोलकाता, गुजरात, दिल्ली व दिल्ली एनसीआर येथील युवा खेळाडू शिस्त, संयम आणि बंधुभाव यांचे उत्तम दर्शन घडवीत आहेत. मैदानावरील त्यांची निष्ठा, मर्यादित आचारसंहिता आणि सेवाभाव या स्पर्धेला प्रेरणेचा उत्सव बनवित आहेत.

या भव्य आयोजनाचे कुशल नियोजन संत निरंकारी मंडळाचे सचीव जोगिंदर सुखीजा यांच्या नेतृत्वाखाली पार पडत आहे. युवकांमध्ये स्पर्धेबाबत प्रचंड उत्साह असून मोठ्या संख्येने नोंदणी झाल्याची माहिती त्यांनी दिली. ही स्पर्धा केवळ क्रीडागुणांना वाव देत नाही, तर आत्मसंयम, ऐक्यभाव आणि आध्यात्मिक जाणीव अधिक दृढ करते. या स्पर्धेची सुरवात बाबा हरदेव सिंहजी यांनी बाबा गुरबचन सिंहजी यांच्या पवित्र स्मृतीप्रित्यर्थ केली होती. युवकशक्तीला संयम, शिस्त आणि सेवाभावाच्या मार्गावर प्रेरित करण्यासाठी क्रीडा हे प्रभावी माध्यम असल्याचा बाबा गुरबचन सिंहजीचा दृढ विश्वास होता.

या शुभारंभ प्रसंगी संत निरंकारी मंडळ प्रधान राजकुमारीजी तसेच केंद्रीय योजना आणि सल्लागार समितीचे उपाध्यक्ष नरेंद्र सिंह यांची विशेष उपस्थिती लाभली. यांच्या सोबत मंडळाच्या अन्य पदाधिकार्यांच्या उपस्थितीने कार्यक्रमाची शोभा वाढली.

# डोंबिवली स्थानक परिसरातील अतिक्रमण करणाऱ्या फेरीवाल्यांवर धडक कारवाई

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली** : महापालिका क्षेत्रातील डोंबिवली (पू.) कडील रेल्वे स्थानक परिसरात उद्भवणाऱ्या फेरीवाल्यांच्या तक्रारीला पायबंद घालण्यासाठी महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांच्या निर्देशानुसार ६/फ प्रभागाचे सहाय्यक आयुक्त प्रसाद ठाकुर यांनी आज सकाळ पासून १७ हातगाड्या जप्त करण्याची कारवाई केली. तर ८/ग प्रभागाचे सहाय्यक आयुक्त भारत पवार यांनी रेल्वे स्थानक परीसरातील रस्त्यावर अतिक्रमण केलेल्या फेरीवाल्यांवर कारवाई करुन १० हातगाड्या, २७ भाजीचे कॅरेट, ३० टांगन्या, २० शेड, ०५ गॅस सिलेंडर, १२ कपड्याची बोचकी, २७ प्लाय व ०८ लाकडी बॉक्स इत्यादी सामान जप्त करुन प्रभाग कार्यालयात जमा केले.




डोंबिवली (पू.) रेल्वे स्थानक परिसरात अतिक्रमण केल्यास अशी कारवाई पुढेही चालू राहील अशी माहिती ६/फ व ८/ग प्रभागाचे सहाय्यक आयुक्त यांनी दिली आहे.

# पावसाळ्यापूर्वी नालेसफाई पूर्ण होईल या दृष्टीने नियोजन करा

## - महापौर शर्मिला पिंपळोलकर यांचे प्रशासनास निर्देश

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे (26)** : ठाणे महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या कामाचा आढावा आज महापौर शर्मिला पिंपळोलकर यांनी घेतला. पावसाळयाच्या पार्श्वभूमीवर शहरातील सर्व नाल्यांची साफसफाई मार्च अखेरीसपासून हाती घेऊन मे अखेरपर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन करावे, असे निर्देश त्यांनी घनकचरा व्यवस्थापन विभागाला दिले.



महापालिकेच्या कै. अरविंद पेंडसे सभागृहात झालेल्या या बैठकीस घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त मधुकर बोडके, आरोग्य अधिकारी डॉ. राणी शिंदे यांच्यासह संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

बैठकीत शहरातील रस्ते साफसफाई, कचरा हस्तांतरण केंद्र, घनकचरा प्रक्रिया प्रकल्प, सामुदायिक व सार्वजनिक शौचालयांची स्थिती, बांधकाम व पाडकाम कचऱ्याची प्रक्रिया तसेच 'स्वच्छ ठाणे व्हिजन' या उपक्रमाची माहिती सादरीकरणाद्वारे देण्यात आली.

शहरातील काही प्रभागांमध्ये सार्वजनिक शौचालयांची नियमित साफसफाई होत नसल्याच्या तक्रारी येत असल्याचे निदर्शनास आणून देत महापौरांनी याकडे विशेष लक्ष देण्याचे आदेश दिले. शौचालयांमध्ये मुबलक पाणी उपलब्ध असावे, पाण्याच्या टाक्या रिकाम्या झाल्यावर तत्काळ भरल्या जाव्यात, तसेच दरवाज्यांचे कडी-कोयंडे सुस्थितीत ठेवावेत, यासाठी संबंधित स्वच्छता निरीक्षकांनी दक्षता घ्यावी, असे त्यांनी स्पष्ट केले.

शहरी भागात ओला आणि सुका कचरा वेगळा केला जात असला तरी झोपडपट्टी भागात हे प्रमाण कमी असल्याचे महापौरांनी नमूद केले. यासाठी नागरिकांमध्ये जनजागृती मोहीम राबविणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

शहरात दोन सत्रांत रस्त्यांची साफसफाई केली जाते. यासाठी १६५६ सफाई कर्मचारी कार्यरत असून 6 वाहनांच्या माध्यमातून यांत्रिकी पद्धतीने स्वच्छता केली जाते. तसेच ओला कचरा प्रकल्प, सुका कचरा प्रकल्प, पूर्वप्रक्रिया केंद्रे आणि बांधकाम व पाडकाम कचऱ्यावर करण्यात येणाऱ्या प्रक्रियेची माहितीही यावेळी देण्यात आली.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून शहरात सर्वंकष स्वच्छता मोहिम राबविण्यात येत आहे. ही मोहिम अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी प्रभागांतील अंतर्गत रस्त्यांची नियमित साफसफाई करावी आणि सर्व प्रभागांमध्ये व्यापक नियोजन करावे, अशा सूचनाही महापौर शर्मिला पिंपळोलकर यांनी या बैठकीत दिल्या.

# जागतिक मराठी भाषा दिनी 'मराठी भाषेचे प्राचीनत्व' विषयावर व्याख्यान

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे (26)** : जागतिक मराठी भाषा दिनाचे औचित्य साधून मराठी भाषेच्या समृद्ध परंपरेचा आणि ऐतिहासिक वारशाचा गौरव करण्यासाठी 'मराठी भाषेचे प्राचीनत्व' (मराठी भाषेच्या जन्मापासून आजवरची स्थित्यंतरे) या विषयावर ज्येष्ठ साहित्यिक व पत्रकार श्रीकांत बोजेवार यांच्या व्याख्यानाचे आयोजन उद्या शुक्रवार दिनांक 27/02/2026 रोजी करण्यात आले आहे. हा कार्यक्रम सायंकाळी 4.00 वाजता महापालिकेच्या कै. नरेंद्र बल्लाळ सभागृह येथे होणार आहे.

या कार्यक्रमास महापौर शर्मिला पिंपळोलकर, उपमहापौर कृष्णा पाटील, सभागृह नेते हणमंत जगदाळे, विरोधी पक्षनेते अशरफ शानू पठाण, अतिरिक्त आयुक्त 1 संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त 2 प्रशांत रोडे, उपायुक्त जी.जी. गोदेपुरे, उमेश बिरारी उपस्थित राहणार आहेत.

मराठी भाषेची उत्पत्ती, तिची प्राचीन मुळे, संत साहित्याची परंपरा, शिवकालीन आणि पेशवेकालीन काळातील भाषेची भूमिका, तसेच आधुनिक काळातील मराठी भाषेचे बदलते स्वरूप यांचा सखोल आढावा ज्येष्ठ साहित्यिक श्रीकांत बोजेवार हे आपल्या व्याख्यानातून घेणार आहेत.

मराठी भाषेचा उगम, तिचे संस्कृत आणि प्राकृत भाषांशी असलेले नाते, विविध शिलालेख आणि ऐतिहासिक दस्तऐवजांतील उल्लेख, तसेच ज्ञानेश्वर, तुकाराम आदी संतांच्या साहित्यामुळे भाषेला लाभलेले वैभव यावरही ते प्रकाश टाकणार आहेत. मराठी ही केवळ संवादाची भाषा नसून संस्कृती, परंपरा आणि अस्मितेची वाहक आहे, हा संदेश या व्याख्यानातून अधोरेखित होणार आहे.

जागतिक मराठी भाषा दिनानिमित्त आयोजित या कार्यक्रमाच्या माध्यमातून मराठी भाषेचे जतन, संवर्धन आणि प्रसार यासाठी समाजात जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांनी, साहित्यप्रेमींनी आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या व्याख्यानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन महापालिकेतर्फे करण्यात आले आहे.

# 'आई' महिला-केंद्रित पर्यटन धोरणाचा कोकणात गजर

## केळशी येथील कृषी पर्यटन महोत्सवात प्रभावी प्रचार

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी मुंबई** : महाराष्ट्र पर्यटन विभागाच्या पुढाकारातून रत्नागिरी जिल्ह्यातील केळशी येथे आयोजित कृषी पर्यटन महोत्सवात 'आई' महिला-केंद्रित पर्यटन धोरणाची व्यापक प्रचार-प्रसिद्धी करण्यात आली. ग्रामीण पर्यटनाला चालना देत महिलांना सशक्त करण्याच्या उद्देशाने राबविण्यात आलेल्या या उपक्रमाला स्थानिक नागरिक, महिला स्वयं-साहाय्य गट, पर्यटन व्यावसायिक आणि शेतकरी बांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. अशी माहिती कोकण विभागीय पर्यटन कार्यालयाने दिली आहे.या महोत्सवादरम्यान महाराष्ट्र पर्यटन विभागाचे प्रकल्प अधिकारी (आई योजना) श्री. मोहित सावळा यांनी उपस्थितांना या धोरणाची सविस्तर माहिती दिली. पर्यटन क्षेत्रात महिलांचा सक्रिय सहभाग वाढविणे, सुरक्षित व सन्मानजनक रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे. तसेच महिला उद्योजकांना प्रोत्साहन देणे, हा या योजनेचा प्रमुख उद्देश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.या कार्यक्रमात महिला पर्यटन मार्गदर्शक व उद्योजकांसाठी कौशल्य विकास प्रशिक्षण, महिला स्वयं-साहाय्य गटांच्या कृषी व ग्रामीण पर्यटन उत्पादनांचे प्रदर्शन व विक्री, महिला पर्यटकांसाठी सुरक्षित, सुलभ आणि विश्वासार्ह पर्यटन सुविधा, ग्रामीण भागात महिला-आधारित कृषी पर्यटन प्रकल्पांना प्रोत्साहन या बाबींवर विशेष भर देण्यात आला. या उपक्रमामुळे कोकणातील ग्रामीण पर्यटनाला नवी गती मिळेल आणि स्थानिक महिलांसाठी रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण होतील, असा विश्वास श्री. सावळा यांनी व्यक्त केला. कृषी पर्यटनाच्या माध्यमातून स्थानिक संस्कृती, परंपरा आणि शेतीपूरक उद्योगांना बळकटी मिळून ग्रामीण अर्थव्यवस्थेला हातभार लागेल, असेही त्यांनी नमूद केले.महोत्सवात महिला स्वयं-साहाय्य गटांनी तयार केलेल्या स्थानिक कृषी व हस्तकला उत्पादनांचे प्रदर्शन आणि विक्री आयोजित करण्यात आली होती. यामुळे ग्रामीण महिलांना बाजारपेठ उपलब्ध होण्यास मदत झाली. तसेच महिला पर्यटकांसाठी सुरक्षित आणि विश्वासार्ह पर्यटन वातावरण निर्माण करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.




# फक्त दहा विद्यार्थी तरीही शिक्षकपद मंजूर; कोकणातील शाळांना मोठा दिलासा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण** : कोकण विभागातील दुर्गम, डोंगराळ आणि सागर किनारपट्टी भागातील मराठी माध्यमाच्या शाळा वाचवण्यासाठी राज्य सरकारने अत्यंत महत्त्वपूर्ण आणि दिलासादायक निर्णय घेतला आहे. पहिली ते आठवीच्या वर्गात कितीही विद्यार्थी संख्या कमी असली तरी किमान एक शिक्षक मंजूर केला जाणार आहे. तसेच, नववी आणि दहावीच्या वर्गात किमान १० विद्यार्थी असल्यास शिक्षकाचे पद मंजूर राहील आणि तो वर्ग दुसऱ्या शाळेत समाविष्ट केला जाणार नाही. शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या निर्णयामुळे कोकणातील बंद पडण्याच्या मार्गावर असलेल्या शेकडो शाळांना जीवदान मिळाले असून, अतिरिक्त ठरणाऱ्या शिक्षकांनाही मोठा दिलासा मिळाला आहे. या बैठकीनंतर १५ मार्च २०२४ च्या शासन निर्णयात सुधारणा करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. कोकणातील भौगोलिक परिस्थिती आणि विखुरलेल्या लोकसंख्येमुळे अनेक शाळांमध्ये विद्यार्थ्यांची पटसंख्या कमी होत आहे. या पार्श्वभूमीवर मंत्री उदय सामंत, मंत्री नितेश राणे, शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, आ. किरण सामंत, आ. महेंद्र दळवी यांनी शिक्षणमंत्र्यांची भेट घेऊन वस्तुस्थिती मांडली. शाळांमधील अंतराचे निकष आणि विद्यार्थ्यांची कमी संख्या लक्षात घेऊन निकष शिथिल करण्याची मागणी शिक्षणमंत्र्यांनी मान्य केली.

# डोंबिवली स्टेशन परिसर फेरीवाला मुक्त करा

**भाजप नगरसेविका रंजना पेणकर यांची महापौर, उपमहापौर, आयुक्तांकडे मागणी**



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : डोंबिवली पूर्व रेल्वे स्टेशन परिसरातील वाढत्या अनधिकृत फेरीवाल्यांच्या समस्येमुळे नागरिकांना होत असलेला त्रास, वाहतुकीची अडचण तसेच सार्वजनिक सुरक्षिततेचा प्रश्न लक्षात घेऊन भाजप नगरसेविका रंजना पेणकर यांनी कल्याण डोंबिवली महानगरपालिका आयुक्त अभिनव गोयल, महापौर हर्षली चोधरी, उपमहापौर राहुल दामले यांची प्रत्यक्ष भेट घेऊन सविस्तर निवेदन सादर केले.

नागरिकांकडून प्राप्त झालेली निवेदने, स्थानिक रहिवाशांच्या मागण्या व सार्वजनिक हिताचा विचार करून हा परिसर फेरीवाला मुक्त करण्याची तसेच अनधिकृत फेरीवाल्यांवर तात्काळ व कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. नागरिकांना सुरक्षित, स्वच्छ व निर्बाध पादचारी मार्ग उपलब्ध व्हावेत अशी मागणी यावेळी करण्यात आली. प्रशासनाने या विषयाची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने कार्यवाही करावी, अन्यथा येणाऱ्या काळात नागरिकांच्या हितासाठी लोकशाही मार्गाने आंदोलन व उपोषण करण्याचा इशारा नगरसेविका रंजना पेणकर आणि मितेश पेणकर यांनी दिला आहे.

# मुरबाड नगराध्यक्ष राजीनामा ; उत्तराधिकाऱ्याची उत्सुकता

दै.ठाणे जीवनदीप वार्ता




**मुरबाड** : शिंदे सेनेत प्रवेश केलेल्या मुरबाड नगरपंचायतचे नगराध्यक्ष संतोष चौधरी यांचे विरोधात सुमारे तेरा नगरसेवकांनी अविश्वास ठराव दाखल केला असता जिल्हाधिकारी ठाणे यांनी आज अविश्वास ठराव पारित करण्यासाठी विशेष सभा बोलावली होती.परंतु संतोष चौधरी यांनी अविश्वास ठरावाला सामोरे जाण्या अधिच जिल्हाधिकारी ठाणे यांचे कडे नगराध्यक्ष पदाचा राजीनामा दिल्याने मुरबाड नगरपंचायतवर असलेली शिंदे सेनेची सत्ता संपुष्टात आली असुन अधिवेशन काळात पालक मंत्री एकनाथ शिंदे यांना भाजपने जोरदार धक्का देत आपले अस्तित्व पुन्हा सिद्ध केले आहे. मुरबाड नगरपंचायतवर भाजपची सत्ता असताना सुमारे ९ नगरसेवकांनी भाजपची साथ सोडत परिवर्तन पॅनेलची स्थापना केली व शिंदे गटात प्रवेश केला.परंतु आपले सोबत असलेल्या नगरसेवका बरोबर समन्वय न ठेवल्याने त्यांनी कथोरे गटातील नगरसेवकाशी हातमिळवणी करत नगराध्यक्ष यांचे विरोधात दि.१७ फेब्रुवारी रोजी जिल्हाधिकारी ठाणे यांचे कडे अविश्वास ठराव दाखल केल्याने ऐन शिवजयंती आणि होळीच्या सणात मुरबाड नगरपंचायत मधील घडामोडींना वेग आला होता . त्यामुळे मुरबाड नगरपंचायतच्या पुढिल नगराध्यक्ष पदी कोणाची वर्णी लागणार याकडे मुरबाड करांचे लक्ष लागले आहे.दरम्यान हा अविश्वास ठराव पारित करण्यासाठी जिल्हाधिकारी ठाणे यांनी आज विशेष सभेचे आयोजन केले होते.परंतु हा अविश्वास ठराव जिंकण्यासाठी शिंदे गटाकडे पुरेसे संख्याबळ नसल्याने त्या अविश्वास ठरावाला सामोरे जाण्यासाठी आठदिवस रणनीती आखली गेली परंतु ती फेल ठरत असल्याचे संकेत नगराध्यक्ष संतोष चौधरी यांना मिळताच त्यांनी बुधवारी जिल्हाधिकारी ठाणे यांचे कडे आपल्या पदाचा राजीनामा देऊन मैदानातून पळ काढला असल्याने मुरबाड नगरपंचायतवर आता भाजपचे आमदार किसन कथोरे यांची एकहाती सत्ता स्थापन होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. मुरबाड नगरपंचायत मध्ये शिंदे गटाचे पाच नगरसेवक व भाजपचे दहा आणि अपक्ष दोन असे पक्षीय बलाबल असताना मुरबाड नगरपंचायत वर भाजपची एकहाती सत्ता असल्याने नगराध्यक्ष संतोष चौधरी हे विराजमान होते.भाजपचा मित्रपक्ष असलेल्या शिंदे गटाच्या नम्रता तेलवणे यांना भाजपने उपनगराध्यक्ष पद देण्याचे जाहीर करताच त्यांनी नम्रता तेलवणे यांना विरोध करत सुमारे नऊ नगरसेवकांनी वेगळा परिवर्तन पॅनल स्थापन करत दिक्षिता वारे यांना उपनगराध्यक्ष पदी बसवले त्याला जिल्हाधिकाऱ्यांची मान्यता घेतली.कालातंराने त्यांनी शिंदे गटाला जाहीर प्रवेश केला.परंतु नगरसेवकांचा समन्वय नसल्याने व मुख्याधिकारी हे वैद्यकीय रजेवर गेल्याने शहराचे विकासासाठी त्यांना कोणताही निर्णय घेण्यासाठी अडचणी येऊ लागल्या त्याचा शहरवासीयांना जोरदार फटका बसू लागला अखेर त्या परिवर्तन पॅनेलला सोडचिठ्ठी देत सुमारे सात नगरसेवक स्वगृही परतले आणि त्यांनी इतर सहा नगरसेवकासह सुमारे तेरा जणांनी नगराध्यक्ष यांचे विरोधात जिल्हाधिकारी यांचेकडे अविश्वास ठराव दाखल करून तेरा ही नगरसेवक नॉट रिचेबल होते.परंतु ते बुधवारी संध्याकाळी मुरबाड मध्ये धडकले आणि आपल्या विजयाचा जल्लोष छत्रपती शिवाजी महाराज चौकात साजरा केला.

*आता उरलेल्या ९ महिन्यासाठी नगराध्यक्ष म्हणून कोणाची वर्णी लागणार हे सर्वस्वी आमदार किसन कथोरे ठरविणार असल्याने गटनेते असलेले मोहन गडगे, माजी नगराध्यक्ष मोहन सासे यांच्या पत्नी नगरसेविका मधुरा सासे यांची नावे चर्चेत असल्याची सुत्रांकडून माहीती मिळत आहे.*

# साईधारा साईबाबा मंदिर वर्धापन दिनी इंदुरीकर महाराजांचे किर्तन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता




प्रवेशद्वारावरील श्री साईबाबा मंदीराचा वर्धापन दिन सोहळा

**पडघा दि.२६** : भिवंडी तालुक्यातील मुबई नाशीक महामार्गालगत असलेल्या भोईरगांव येथील साईधारा लॉजेस्टीक पार्कमधील साईबाबा मंदिर १० वर्धापनदिन विविध आध्यात्मिक कार्यक्रमाव्दारे उत्साहात साजरा करण्यात यावेळी निवृत्ती महाराज देशमुख इंदुरीकर यांच्या किर्तनाला नागरीकांचा उस्फूर्त प्रतिसाद मिळाला. साईधारा मुख्य ह. भ. प. गुरूवर्य केशव महाराज लाप. साईधारा लॉजेस्टीक पार्कचे प्रमुख उद्योजक पद्माकर पांडुरंग भोईर यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवारी घेण्यात आला. यावेळी आरती, महाअभिषेक, गणेशपुजन, होमहवन दुपारी वज्राई युवा कलांमचच्या गायीका धनश्री पाटील यांनी संगीत भजन व सायंकाळी भोईरगांव, परीसर यांनी सामुदायिक हरिपाठ असे अध्यात्मिक कार्यक्रम सादर झाले तर रात्री प्रसिद्ध ह.भ.प.निवृत्ती महाराज देशमुख इंदुरीकर समाजप्रबोधनपर किर्तन सादर करण्यासाठी उपस्थित होते. कलीयुगात माणुस संताच्या विचाराशिवाय जगु शकत नाही. कलीयुगात माणसे पैशावर प्रेम करतात. पैशाचा रोग मनाला झालाय, मनाला झालेल्या पैशाच्या रोगाला औषध नाही. आई, वडील, ग्रंथ भागवतात सुखी करण्याची ताकत, आहे. मेल्यावर मोक्ष मिळो अथवा न मिळो भजनाने, नामाने मोक्ष मिळतो.अंगातील ताकत खिशातील पैसा संपला की तुमचे महत्व संपते. ज्ञानेश्वरी नुसता ग्रंथ नाही.तर अमृताचा समुद्र आहे. काकडा, हरीपाठ जिवतं मोक्ष आहे. कोण कोणाचा नाही हा सर्व मायेचा बाजार आहे. चांगल्या गोष्टीमुळे धर्म जागेवर आहे. जास्त संपत्ती मिळवणे म्हणजे मागची पिढी आळशी करणे.सुखी होण्यासाठी थोडा वेळ देवाला द्या.आदी विषयांवर किर्तन सादर करून उपस्थितांची वाहवाह मिळवली. यावेळी भिवंडी पुर्व मंडळ तालुका अध्यक्ष श्रीकांत गायकर, माजी सरपंच संतोष भोईर, भरत पाटील, निलेश देसले, भरत शेलार साईधारा कार्यालयीन कर्मचारी रुपेश पाटील, भावीक ठक्कर, भुषण सिंगासने उपस्थित होते.

# ग्रामस्वच्छता व महाआवासात ठाणे जिल्हा आघाडीवर

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



**शहापूर ग्रामीण** : संत गाडगेबाबा यांच्या स्वच्छतेच्या विचारांवर आधारित संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान अंतर्गत सन २०१८-१९, २०१९-२०, २०२०-२१, २०२१-२२ तसेच २०२२-२३ या वर्षांतील स्पर्धेत निवड झालेल्या ग्रामपंचायतींच्या बक्षीस वितरणाचा कार्यक्रम विभागीय आयुक्त, कोंकण विभाग डॉ. विजय सुर्यवंशी यांच्या अध्यक्षतेखाली दि. २५ फेब्रुवारी २०२६ रोजी सिडको कार्यालय सभागृह, सातवा मजला, सिडको भवन, बेलापूर, नवी मुंबई येथे संपन्न झाला. जिल्हा परिषद, ठाणे अंतर्गत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ग्रामपंचायतींना यावेळी गौरविण्यात आले. संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान अंतर्गत सन २०२२-२३ या वर्षातील विभागस्तरीय स्पर्धेमध्ये ग्रामपंचायत वडपे (ता. भिवंडी) यांनी द्वितीय क्रमांक पटकावत सन्मानचिन्ह व रुपये ९ लाखांचा धनादेश प्राप्त केला. तसेच ग्रामपंचायत जांभूळ (ता. कल्याण) यांनी तृतीय क्रमांक मिळवून सन्मानचिन्ह व रुपये ७ लाखांचा धनादेश प्राप्त केला. पुरस्कारांचे वितरण विभागीय आयुक्त, कोंकण विभाग आयुक्त डॉ. विजय सुर्यवंशी यांच्या हस्ते करण्यात आले. स्वच्छता, कचरा व्यवस्थापन, सांडपाणी नियोजन, लोकसहभाग व ग्रामस्तरावरील जनजागृती या बाबींमध्ये उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल संबंधित ग्रामपंचायतींचा गौरव करण्यात आला. याच कार्यक्रमात महा आवास अभियान २०२३-२४ अंतर्गत राज्य पुरस्कृत घरकुल योजना प्रभावीपणे राबविल्याबद्दल सर्वोत्कृष्ट जिल्हा – तृतीय क्रमांक हा पुरस्कार जिल्हा परिषद ठाणे यांना प्रदान करण्यात आला. राज्य पुरस्कृत आवास योजना २०२३-२४ अंतर्गत मानीवली ग्रामपंचायतीला तृतीय पारितोषिक मिळाले. घरकुल बांधकामाची गती, पारदर्शक अंमलबजावणी व लाभार्थ्यांपर्यंत योजनांचा प्रभावी लाभ पोहोचविल्याबद्दल हा सन्मान देण्यात आला. या यशाबद्दल जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव, प्रकल्प संचालक छायादेवी शिसोदे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छ विभाग) पंडित राठोड तसेच सर्व गट विकास अधिकारी आणि संबंधित अधिकारी-कर्मचारी यांच्या टीमचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले. कार्यक्रमास अप्पर आयुक्त (विकास) कोकण भवन डॉ. माणिक दिवे, संचालक राज्य व्यवस्थापन कक्ष ग्रामीण गृहनिर्माण राजाराम दिघे, व्याख्याते प्रशांत देशमुख, अतिरिक्त सहाय्यक आयुक्त सिद्धराम सालीमठ, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद रायगड नेहा भोसले, जिल्हा परिषद ठाणेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव, सहाय्यक प्रकल्प अधिकारी आरती गगे, शालेय आरोग्य व स्वच्छता सल्लागार जिल्हा परिषद ठाणे सारिका देशमुख, पाणी व स्वच्छता सल्लागार जिल्हा परिषद ठाणे स्नेहल सोनवणे, विस्तार अधिकारी (ग्रामपंचायत) ता. कल्याण पराग भोसले, ग्रामपंचायत अधिकारी वडपे भालचंद्र पवार, सरपंच वडपे प्रेमनाथ वाडोलकर, तात्कालीन सरपंच जांभूळ परीक्षित पिसाळ, तात्कालीन ग्रामपंचायत अधिकारी जांभूळ राजाभाऊ सुरवशे, ग्रामपंचायत अधिकारी जांभूळ अश्विनी यशवंतराव, उपसरपंच जांभूळ अक्षय सावंत, तंटामुक्ती अध्यक्ष वडपे सुनील पाटील, माजी सरपंच वडपे शशिकला पाटील, सरपंच मानिवली सुकन्या गायकर, ग्रामपंचायत अधिकारी मानिवली स्वाती शेलार तसेच ग्रामपंचायत कर्मचारी मानिवली सुरेश गायकर आणि जिल्हा परिषद ठाणेचे इतर अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्वच्छता व ग्रामीण विकासाच्या क्षेत्रात ठाणे जिल्ह्याने सातत्यपूर्ण व प्रभावी कामगिरी करत राज्य व विभागीय स्तरावर मानाचे स्थान मिळविल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले. भविष्यातही अशाच प्रकारे लोकसहभागातून विकासकामे राबविण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

# रायगड जिल्ह्यामध्ये राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**रायगड** : महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण आणि उच्च न्यायालय, मुंबई यांच्या आदेशावरून संपूर्ण रायगड जिल्ह्यामध्ये दि.14 मार्च 2026 रोजी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले असून या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये जास्तीत जास्त प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे आणि या लोक अदालतीचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड अलिबाग राजेंद्र द. सावंत यांनी केले आहे. या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये रायगड जिल्ह्यातील सर्व न्यायालयात प्रलंबित असलेली दिवाणी व तडजोडपात्र फौजदारी प्रकरणे, दिवाणी व तडजोडपात्र फौजदारी अपिले, मोटार अपघात प्रकरणे, विवाह विषयक प्रलवित प्रकरणे तसेच ग्रामपंचायत यांच्याकडील घरपट्टी, पाणीपट्टी बिलाच्या देयकाबाबतची वादपूर्व प्रकरणे, भारत दूर संचार निगम लिमिटेड, विजवितरण, राष्ट्रीयकृत बँका आणि पतसंस्था व इतर वित्तीय संस्था यांच्याकडील थकबाकीबाबतची वादपूर्व प्रकरणे सदर लोक अदालतीमध्ये तडजोडीसाठी ठेवण्यात येतात. लोकअदालतीचे फायदे पक्षकारांना कोणत्याही प्रकारची फी भरावी लागणार नाही. लोकन्यायालयाच्या निवाडयाविरूध्द अपील नाही. न्यायालयाच्या हुकूमनाम्याप्रमाणे लोकन्यायालयात होणाऱ्या निवाडयाची अंमलबजावणी न्यायालयामार्फत करता येते. खटल्यांमध्ये साक्षी-पुरावा, उलटतपासणी, दिर्घ युक्तिवाद या बाबी टाळल्या जातात. लोकन्यायालयात निकाली निघणाऱ्या प्रकरणामध्ये कायद्यानूसार कोर्ट फी ची रक्कम परत मिळते व निर्णय अंतिम व बंधनकारक असतो. लोक अदालतीमध्ये प्रकरण निकाली निघाल्यास वेळ, पैसा व श्रम यांची मोठ्या प्रमाणात बचत होते. यापूर्वी मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड अलिबाग यांच्या मार्गदर्शनाखाली दि.13 डिसेंबर 2025 रोजी झालेल्या राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये प्रलंबित 5 हजार 169 आणि वादपूर्व 12 हजार 751 असे एकूण 17 हजार 920 एवढी प्रकरणे निकाली निघाली आहेत. यामुळे रायगड जिल्ह्यातील संपूर्ण नागरिकांना फायदा झाला आहे. नागरीकांना ही संधी पुन्हा मिळणार आहे.






# विविध कृषी पुरस्कारांकरीता इच्छुक शेतकरी, व्यक्ती, संस्था, गटांनी ऑनलाईन अर्ज करावेत

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**रायगड** : डॉ.पंजाबराव देशमुख कृषिरत्न, वसंतराव नाईक कृषिभूषण, जिजामाता कृषिभूषण, वसंतराव नाईक शेतीमित्र, वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी, उद्यानपंडित पुरस्कार, कृषिभूषण (सेंद्रिय शेती), युवा शेतकरी पुरस्कार तसेच कृषी विभागातील अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठीचा पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषी सेवारत्न पुरस्काराकरिता इच्छुक शेतकरी, व्यक्ती, संस्था, गट यांनी सन-२०२५ पासूनचे विविध कृषी पुरस्काराकरिता संगणक प्रणालीद्वारे ऑनलाईन अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्रीमती वंदना शिंदे यांनी केले आहे. महाराष्ट्र राज्य हे कृषि उत्पादन व कृषी उद्योग क्षेत्रात देशात अग्रगण्य राज्य म्हणून ओळखले जाते. राज्यामध्ये दरवर्षी शेती व पूरक क्षेत्रात अतुलनीय व उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकरी, महिला, व्यक्ती तसेच संस्थांचा सन्मान महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत करण्यात येतो. हे पुरस्कार मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांच्या शुभहस्ते प्रदान करून संबंधितांना सन्मानित करण्यात येते.

यापूर्वी विविध कृषी पुरस्कारांचे प्रस्ताव चार प्रतींमध्ये ऑफलाईन पद्धतीने स्विकारण्यात येत होते. प्रस्ताव बनविण्यासाठी खर्च येत असल्याने सर्व इच्छुक शेतकरी अर्ज करू शकत नव्हते. या पारंपारिक पद्धतीमुळे प्रस्ताव सादरीकरण, पडताळणी व संकलनासाठी अधिक कालावधी लागत होता. या पार्श्वभूमीवर पुरस्कार प्रस्तावांची प्रक्रिया अधिक सुलभ, वेळबद्ध, पारदर्शक व प्रभावी करण्याच्या दृष्टीने कृषी विभागामार्फत पुरस्कार प्रस्ताव ऑनलाईन स्वरूपात स्विकारण्यासाठी स्वतंत्र संगणकीय प्रणाली विकसित करण्यात आलेली आहे. सदर प्रणाली कृषी विभागाच्या संकेतस्थळावर (https://krishi.maharashtra.gov.in, ) कृषी पुरस्कार टॅब मध्ये उपलब्ध आहे.

या संगणकीय प्रणालीच्या माध्यमातून पुरस्कार प्रस्ताव सादरीकरण, तपासणी, मूल्यांकन तसेच अहवाल निर्मिती ही संपूर्ण प्रक्रिया डिजिटल स्वरूपात राबविणे शक्य होणार आहे. यामुळे मानवी हस्तक्षेप कमी होऊन पारदर्शकता वाढणार असून पुरस्कार प्रक्रियेची कार्यक्षमता, विश्वासार्हता व परिणामकारकता अधिक बळकट होणार आहे. तसेच शेतकऱ्यांना खालीलप्रमाणे फायदा होणार आहे.

ऑनलाईन प्रणालीमुळे शेतकऱ्यांना घरबसल्या अर्ज सादर करता येणार. ऑफलाईन चार प्रतींमधील प्रस्ताव तयार करण्यासाठी लागणारा वेळ व खर्च वाचून प्रस्ताव सादरीकरण जलद गतीने होणार आहे. एकदाच अपलोड केलेली कागदपत्रे पुन्हा-पुन्हा देण्याची आवश्यकता नाही. अर्ज कुठल्या टप्प्यावर आहे याची माहिती शेतकऱ्यांना सहज मिळणार आहे. छपाई, झेरॉक्स, प्रवास व पोस्ट खर्च कमी होणार असून आर्थिक भार कमी होणार आहे.

# डोलवी नजीक अपघातात एक ठार एक जखमी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण** : रायगड जिल्ह्यातील डोलवी गावाजवळ, जेएसडब्ल्यु कंपनीसमोरील पुलावर २५ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळच्या सुमारास भीषण अपघात झाला. मिक्सर ट्रक (MH 04 KU 0532) आणि मोटारसायकल (MH 06 BZ 8347) यांच्यात झालेल्या धडकेत महेश बाळकृष्ण जाधव (वय ३४, रा. पन्हळघर, ता. माणगाव, जि. रायगड) यांचा जागीच मृत्यू झाला, तर त्यांची पत्नी गंभीर जखमी झाली आहे.

या प्रकरणी फिर्यादी विश्वनाथ पाटील (रा. खार जांभेळा, ता. पेण) यांनी पोलिसांत तक्रार दाखल केली असून CR No. 12/2026 अंतर्गत भारतीय दंड संहिता 2023 चे कलम 281, 106(1), 125(अ), 125(ब) तसेच मोटार वाहन कायदा कलम 184 व 134 अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. वडखळ पोलीस ठाणेचे हवालदार कोंडे या अपघाताचा तपास करत असून मिक्सर ट्रक चालकाचा शोध सुरू आहे.

अपघातामुळे काही काळ महामार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती; मात्र पोलिसांच्या तातडीच्या हस्तक्षेपामुळे वाहतूक लवकर सुरळीत करण्यात आली. या घटनेनंतर डोलवी परिसरात महामार्ग सुरक्षेबाबत प्रश्न उपस्थित झाले असून, स्थानिक नागरिकांनी प्रशासनाने अधिक कडक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली आहे.


Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024